



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २०५ वा गुरूवार दि ०२ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अजित पवार आणि शरद पवार यांची भेट, दोघांमध्ये तासभर चर्चा, पडद्यामागे काय घडलं?

**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकारणातील सध्याच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोन्ही बड्या नेत्यांची भेट झाल्याची मोठी बातमी समोर येत आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्यात तासभर चर्चा देखील झाल्याची माहिती आहे. मुंबईत वाय. बी. चव्हाण सेंटर येथे दोन्ही नेत्यांची भेट झाल्याची माहिती आहे. दोन्ही नेते याआधी देखील विविध कारणास्तव भेटल्याचा इतिहास आहे. राष्ट्रवादी पक्षाच्या फुटीनंतर दोन्ही नेते याआधीदेखील अनेकदा भेटले आहेत. पण राष्ट्रवादीचे दोन्ही गटात एकमेकांच्या विरोधात टोकाचा राजकीय वाद असल्यामुळे या भेटीला जास्त महत्त्व प्राप्त झालं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, माळेगाव साखर कारखान्याबाबत चर्चा करण्यासाठी दोन्ही नेत्यांची भेट झाली आहे. माळेगावच्या वार्षिक साधारण सभेची तारीख आणि वेळ ठरवण्यासाठी दोन्ही नेत्यांची भेट झाल्याची माहिती आहे. अजित पवार यांनी स्वत: याबाबत टीव्ही ९ मराठीला प्रतिक्रिया दिली आहे. ङ्घशरद पवार हे माळेगावचं शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आहेत. तिथल्या सभासदांनी मागेच त्यांना अध्यक्ष केलं आहे. तिथे जी बॉडी आहे, माळेगाव सहकारी साखर कारखान्याचा चेअरमन हा त्या बॉडीवर व्हाईस चेअरमन म्हणून येतो. अशी त्याची घटना आहे. त्यामुळे ते इलेक्शन झाल्यानंतर त्याबद्दलची जी बैठक होती त्यासाठी मी आलो होतो. ती बैठक झाली. विश्वस्त



मंडळ नेमायचं असतं. तो अधिकार अध्यक्षांनाच असतो. आमचे सहा गट आहेत. त्यातील प्रत्येकी एक प्रतिनिधी घ्यायचा असतो, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी शरद पवारांच्या भेटीनंतर दिली. आता आपल्याला सगळ्यांना माहिती आहे की, वार्षिक सर्वसाधारण सभा चाललेल्या आहेत. त्या सर्वसाधरण सभेची तारीख आणि वेळ ठरवायची होती. किती ॲडमिशन झाले याबाबत बैठक होतीङ्घङ्घ, अशी माहिती अजित पवारांनी दिली. दरम्यान, या भेटीत दोन्ही नेत्यांमध्ये काही राजकीय चर्चा झाली का? याबाबतची माहिती समजू शकलेली नाही.

# एकनाथ शिंदेंचा तो आदेश अन् प्रताप सरनाईकांकडून एसटी प्रवाशांसाठी मोठा दिलासा...

**वृत्तसंस्था/मुंबई**

एसटी महामंडळाने दिवाळीसाठी हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र ही भाडेवाढ रद्द करण्यात आली असून राज्यातील पूरस्थितीमुळे हा निर्णय घेण्यात आला. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत निर्देश दिले होते. यामुळे दिवाळीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून महामंडळाला यातून मिळणारे ३० कोटी रुपयांचे उत्पन्न सोडावं लागणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही १० टक्के हंगामी भाडेवाढ जाहीर करण्यात आली होती. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, राज्यातील पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अर्थात, एसटी प्रशासनाने दिवाळीसाठी केलेली हंगामी १० टक्के बस भाडेदरवाढ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे दिवाळीत एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांना याबाबत निर्देश दिले होते. राज्य परिवहन प्राधिकरणाकडून एसटी महामंडळाला ३० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार, काही दिवसांपूर्वीच एसटी महामंडळाने दर वर्षीप्रमाणे यंदाही दिवाळी सणासाठी १० टक्के हंगामी भाडेवाढ जाहीर केली होती. या निर्णयानुसार १५ ऑक्टोबरपासून ५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत या कालावधीत ही भाडेवाढ लागू होणार होती. परंतु, अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांचे झालेले प्रचंड नुकसान लक्षात घेऊन हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचे निर्देश एकनाथ शिंदे यांनी दिले. एसटी महामंडळ दरवर्षी दिवाळीच्या काळात प्रवासी संख्या लक्षात घेत १० टक्के भाडेवाढ करत असते. महामंडळाला यातून साधारण अतिरिक्त ३० कोटी रुपयांचा महसूल मिळतो. परंतु यंदा राज्यात निर्माण झालेली पूरस्थिती लक्षात घेऊन भाडेवाढीचा मागे घेण्याचा निर्णय घेतल्याचे शिंदे यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले. दरम्यान, भाडेवाढीच्या निर्णयामुळे मुंबईहून अहिल्यानगरला जाणाऱ्या प्रवाशांना अतिरिक्त ७३ रुपये द्यावे लागणार होते. तसंच मुंबईतून



छत्रपती संभाजीनगरला जाणाऱ्यांना १५१ रुपये अधिक मोजावे लागणार होते. सरकारकडून भाडेवाढीमधून ई-बसना वगळण्यात आले होते. त्यानंतर आता सर्वच हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आल्याने सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ज्येष्ठांसाठी नवी सुरुवात...

## संपादकीय लेख

गेल्या वर्षापर्यंत (२०२४) भारतातील ज्येष्ठ नागरिकांची संख्या १५.७ कोटी होती. २०५० पर्यंत हा आकडा ३४.६ कोटींपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे, जो देशाच्या एकूण लोकसंख्येच्या २०.६ टक्के असेल. साहजिकच ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षितता, आरोग्य, राहणीमान याबाबत सरकार सतर्क आहे. नवनव्या योजना आखताना ज्येष्ठांचा विचार केला जात आहे. त्यांना विविध स्तरांवर सवलती दिल्या जात आहेत. उदाहरणार्थ बस, विमान भाड्यात सवलत, (रेल्वे भाड्यातील सवलत पुन्हा सुरू व्हावी यासाठी जेष्ठ नागरिक संघ प्रयत्नशील आहेत), दूरध्वनी देयक, प्राप्तिकर कायद्यात सवलत, बँकेतील ठेवींवर जास्त व्याज इत्यादी. ज्येष्ठांचे विविध सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक आणि सुरक्षासंबंधी प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकारने ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर केले आहे. तरीही ज्येष्ठ नागरिकांवरील उपचारांसाठी सरकारी रुग्णालयात स्वतंत्र कक्ष, पूर्णवेळ विरंगुळा केंद्र, उद्यानांमध्ये राखीव जागा आदी बाबी अद्याप कागदावरच राहिल्या आहेत गेल्या काही दशकांत एकत्र कुटुंब पद्धतीची जागा विभक्त कुटुंब पद्धतीने घेतली. त्यामुळे ज्येष्ठांसाठी गृहनिर्माण ही काळाची गरज बनली आहे. ज्येष्ठांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण योजना राबवताना, इमारती कशा असाव्यात, त्यात कोणत्या सुविधा असायला हव्यात, याबाबत केंद्रीय गृहनिर्माण मंत्रालयाने जी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत, त्यानुसार इमारतीत पहिल्या मजल्यापासूनच लिफ्ट बंधनकारक, इमारतीच्या परिसरात व्हीलचेअर फिरू शकेल असा प्लॅन, मोठे व सरकते दरवाजे, स्नानगृहात न घसरणाऱ्या टाइल्स, शौचालयाचा दरवाजा बाहेरून उघडणारा, जिन्याच्या दोन्ही बाजूला धरण्यासाठी हँडल्स, स्वयंपाकघरात गॅस प्रतिरोधक यंत्रणा इ. सुविधा बंधनकारक आहेत. मात्र काही विकासक ङ्गज्येष्ठांसाठी विशेष गृहनिर्माण प्रकल्पाफ्वी घोषणा करताना या सुविधा पुरवण्याचे खोटे आश्वासन देतात आणि नंतर त्यांना टोलवतात. यासाठी आता विकासकांना करारनाम्यातच, या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सुविधा दिल्याचे नमूद करावे लागणार आहे. अन्यथा ङ्गमहारेराफ्कडे ( महाराष्ट्र रिअल इस्टेट नियामक प्राधिकरण ) दाद मागण्याचा मार्ग खुला आहे. त्यानुसार संबंधित विकासकावर दंडात्मक कारवाई होऊ शकते. ज्येष्ठांना अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय मदतीस नकार देणे हा दखलपात्र गुन्हा मानला जातो. या संदर्भात लोकसभेने २००७ साली मंजूर केलेल्या कायद्यानुसार, आई-वडिलांचा सांभाळ करणे मुलांवर बंधनकारक आहे. ते केले नाही तर तीन महिने कारावास आणि दंडाची तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी कोर्टात जाण्याचीही गरज नाही, प्रत्येक जिल्ह्यातील समाजकल्याण अधिकाऱ्यांना या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार दिले आहेत. आई-वडिलांना मुला-मुलींकडून पोटगी मागण्याची तरतूदही या कायद्यात आहे. या कायद्यातील विशेष बाब म्हणजे, ज्येष्ठांनी मुलांना आपली संपत्ती दिल्यावर जर ते माता-पित्यांची उपेक्षा करत असतील तर ते आपला पैसा परत मागू शकतात. मात्र कायदा बाजूने असूनही मुलांनी कितीही त्रास दिला तरी, त्यांच्याविरुद्ध तक्रार करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक पुढे येत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत त्यांच्यावरील अत्याचार रोखण्यासाठी पोलिस आणि ज्येष्ठांच्या संघटना यांच्यातील समन्वय गरजेचा आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ठाण्याचे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी पुढाकार घेऊन ठाणे पोलिस आयुक्तालयातर्फे अलीकडेच सुरू केलेल्या ङ्गज्येष्ठ नागरिक आधारवडफ या प्रभावशाली ॲपची माहिती, ठाणे जिल्हा ज्येष्ठ नागरिक मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष प्रकाश दिघे यांनी दिली. हे ॲप पोलिसांशी थेट जोडलेले आहे. शहराच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना मदतीची तत्काळ गरज भासल्यास या सुविधेद्वारे अवघ्या पाच मिनिटांत मदत मिळू शकते. शहराच्या प्रत्येक भागात एक-दोन बीट मार्शल (खास पोलिस) यांना बाइकवरून अखंड गस्त घालण्याचे काम देण्यात आले आहे. ६५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांची माहिती पोलिसांतर्फे पडताळून मगच त्यांना या लिंकशी जोडले जाते. त्यामुळे या ॲपचा कोणीही गैरवापर करू शकत नाही. ज्येष्ठ नागरिकांच्या नोंदणीसाठी ठाण्यातील ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समिती प्रमुख भूमिका निभावत आहे. ज्येष्ठांना दिलासा देणाऱ्या या उपक्रमाचे अनुकरण जागोजागी व्हायला हवे. वृद्धाश्रम ही आता काळाची गरज आहे. राज्य सरकारच्या ज्येष्ठ नागरिक धोरणातही, नगरविकास विभागाकडून नवी टाऊनशिप किंवा मोठ्या संकुलास परवानगी देताना, त्या परिसरात वृद्धाश्रम स्थापन करणे सक्तीचे करावे, अशी तरतूद आहे. मात्र ङ्गप्रत्येक जिल्ह्यामध्ये सरकारचा निदान एक तरी वृद्धाश्रम वा विरंगुळा केंद्र असावे, ज्यात किमान १५० लोकांची व्यवस्था असेल,फ ही ज्येष्ठ नागरिक संघाची मागणी अद्याप मान्य झालेली नाही. तसेच विरंगुळा केंद्र त्या-त्या भागातील ज्येष्ठ नागरिक संघाला चालवण्यास द्यावे, ही देखील त्यांची मागणी आहे. नवा वृद्धाश्रम उभारताना सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिरवडे गावातील ङ्गमाझं आजोळफ या वृद्धाश्रमाचा आदर्श ठेवायला हरकत नाही. वृद्धाश्रम म्हटलं की वातावरणात जे नैराश्य, हतबलता दाटून आलेली दिसते, त्याला हा वृद्धाश्रम अपवाद आहे कारण संस्थेच्या विश्वस्तांनी वृद्धाश्रम आणि ङ्गनिसर्ग सान्निध्यातील हॉलिडे होममयांची घातलेली उत्तम सांगड. या व्यवस्थेमुळे कोकणात फिरायला आलेले पर्यटक किंवा ङ्गमाझं आजोळफमध्ये राहणाऱ्या वृद्धांचे नातलग इथे परवडणाऱ्या दरात हवे तितके दिवस राहू शकतात. त्यामुळे वातावरणात चैतन्य राहून वृद्धांचं जीवन सुखकर होतं. सरकारच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना किंवा श्रावणबाळ राज्य निवृत्ती योजना, गावाकडील शेतात राबून थकलेल्या वृद्ध मजुरांपर्यंत पोहोचत नाहीत. अशा कष्टकऱ्यांना तसेच अपंग वृद्धांना जगण्यापुरते जीवनवेतन म्हणून किमान महिना दोन हजार रुपये द्यावेत, ही ज्येष्ठ नागरिक संघाची मागणीही अद्याप फाइलमध्ये बंदिस्त आहे. एक ऑक्टोबर हा ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून बऱ्याच जणांना परिचित आहे. त्याबरोबर १५ जून हा छळ प्रतिबंधक दिन आणि २१ सप्टेंबर हा स्मृतिभ्रंश दिन म्हणून साजरे केले जातात, हेही लक्षात घेण्याजोगं. या विषयांवर सतर्क होण्यासाठी, शासन आणि ज्येष्ठ नागरिक संघातर्फे जनजागृती अभियान राबवण्यात येते. ग्राहक पेठ किंवा ग्राहक संस्थादेखील ज्येष्ठ नागरिकांना ग्राहक शिक्षण देऊन त्यांच्या हिताचे रक्षण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत. केवळ सरकारवर किंवा संघटनांवर अवलंबून न राहता, ज्येष्ठ आपल्या आनंदाचा पर्याय स्वतःच शोधू शकतात. त्यासाठी आपल्याच वसाहतीत मित्रमंडळींसमवेत कट्टा सुरू करणे हा एक उत्तम पर्याय आहे. या ठिकाणी जमणारे बुजुर्ग आपलं मन मोकळं करू शकतात; शिवाय मधून मधून एखादा वक्ता, लेखक, गायक अशा व्यक्तींना बोलवलं तर वेगळा आनंद मिळू शकतो, मग कट्ट्यावर जाण्याची ओढ लागते, जीवनाला काही तरी अर्थ प्राप्त होतो. असे बरेच कट्टे ज्येष्ठांना फुलवत आहेत. हा झाला ज्येष्ठांसाठी प्रत्यक्षात असलेल्या आणि काही बासनात बांधलेल्या सुविधांचा लेखाजोखा, पण इतकाच, किंबहुना अधिक महत्त्वाचा ठरतो तो स्वतः आचरणात आणलेला मार्ग. परिस्थितीशी जुळवून घेणे, झेपेल इतका व्यायाम करून शरीरस्वास्थ्य सांभाळणे, समवयस्कांबरोबर संवाद, मन सतत व्यग्र ठेवणे, सामाजिक कामात जमेल तसा सहभाग या रूळांवरून जात असताना एकवेळ तुमचं शरीर थकेल, पण मन कायम आनंदी व तरुण राहील.

# जिल्हाधिकाऱ्यांची राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक संपन्न

**वृत्तसंस्था/ बुलढाणा**



अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदार नोंदणी कार्यक्रमासंदर्भात राजकीय पक्षांना माहिती देण्यासाठी सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी बैठक संपन्न झाली. या बैठकीला उपजिल्हाधिकारी सुहासीनी गोणेवार, उपशिक्षणाधिकारी (मा) आशिष वाघ, भाजपाचे मंदार बाहेकर, अजित गुऱ्हे, काँग्रेसचे सुनिल सपकाळ, सीपीएमचे जितेंद्रकुमार चोपडे, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) चे ज्ञानेश्वर शेळके, काँग्रेसचे ए. आर. राजपुत, शिवसेना (उ.बा.ठा) चे लखन गाडेकर, मनसेचे अमोल पाटील, बहुजन समाज पार्टीचे सुरेश चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे एस.टी. सोनोने, शिवसेना (शिंदे) चे दिलीप सरकटे आदी उपस्थित होते.


या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी मतदार नोंदणी कार्यक्रमाच्या टप्प्यांची माहिती देतांना म्हणाले, मागच्या निवडणुकीत ७,७८४ मतदार होते. जुन्या मतदार याद्या ऐवजी आता नव्याने मतदार याद्या तयार करण्यात येणार आहे. मतदार अधिकाऱ्यांची नावे जाहीर झाले आहेत. त्यांच्याकडे पात्र मतदारांना फॉर्म १९ मध्ये माहिती भरुन आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करावे लागणार आहे. माध्यमिक शाळेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थामधील ३ वर्ष पूर्णवेळ कार्यरत असलेले शिक्षक मतदार नोंदणीस पात्र राहणार आहे. राजकीय पक्षांना एक गठ्ठा मतदार नोंदणीचे अर्ज करता येणार नाही, अशी माहिती त्यांनी या बैठकीत दिली.

# भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा संपन्न

**जनसंचलन/ बुलढाणा**



जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा निवासी उपजिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी संपन्न झाली. या सभेला पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे अधिकारी आदी उपस्थित होते. या बैठकीत प्रलंबित असलेले चौकशी व कार्यवाहीचे अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांनी दिले.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

## मंत्रिमंडळ बैठकीतील बातमी फुटली, मुख्यमंत्री आक्रमक..

# आता नवीन नियम, प्रशासनाने काय निर्णय घेतला?




**मुंबई :** राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीला यापुढे मंत्री, सचिव व मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री कार्यालयातील अधिकाऱ्यांव्यतिरिक्त कोणत्याही अधिकाऱ्यास मुख्य सचिवांच्या परवानगीशिवाय उपस्थित राहता येणार नाही, असा दंडक बुधवारी जाहीर करण्यात आला आहे. तसंच मुख्यमंत्री कार्यालय आणि उपमुख्यमंत्री कार्यालयातील ज्या अधिकाऱ्यांना मंत्रिमंडळ बैठकीला उपस्थित राहणं आवश्यक आहे, अशा अधिकाऱ्यांची यादी यापुढे मुख्य सचिव कार्यालयाला कळवणं बंधनकारक करण्यात आलं आहे. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकांना हजर राहणाऱ्या आगंतुक अधिकाऱ्यांना आता चांगलाच चाप बसणार आहे.

मंत्रिमंडळ बैठकीची गोपनीयता राहण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वच अधिकारी व मंत्र्यांना तंबी दिल्यानंतर मंत्रिमंडळ बैठकीतील खडाजंगी बाहेर येणं काहीसं बंद झालं आहे. तरीही काही मंत्री व अधिकारी माध्यमांना माहिती देत असल्याच्या संशयावरून हा प्रकारही मुख्यमंत्र्यांनी बंद करण्यास सांगितला. तसंच मंत्रिमंडळ बैठकीला केवळ मंत्री व सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांनाच प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु, गेल्या महिन्यात मंत्रिमंडळ बैठकीला एका मंत्र्याचा विशेष कार्यकारी अधिकारी परवानगीविना उपस्थित होता.

त्यावेळी त्या अधिकाऱ्याला कोणाचे 'अभय' होते अशी चर्चा सुरू झाली होती आणि अखेर मुख्यमंत्र्यांनीच पोलिसांना पाचारण करत बाहेर जाण्यास सांगितले होतेराज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी मंत्रिमंडळ बैठकीस उपस्थित राहणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी सोमवारी आचारसंहिता जाहीर करीत आगंतुकांची कानउघाडणी केली आहे. मंत्रिमंडळ बैठकीत विविध विषयांबाबत होणारी चर्चा अत्यंत गोपनीय असते. मंत्रिमंडळ बैठकीची गोपनीयता, पावित्र्य आणि म हत्त्व अबाधित ठेवणं अत्यंत आवश्यक असल्याकडे मुख्य सचिवांनी लक्ष वेधलं आहे.

### आचारसंहिता काय सांगते?

1. *मंत्रिमंडळ बैठकीसाठी यापुढे फक्त मंत्रिमंडळाचे सदस्य आणि मंत्रिमंडळापुढे विचारार्थ सादर करण्यात आलेल्या प्रकरणांशी संबंधित मंत्रालयीन सचिव यांनीच उपस्थित राहणे बंधनकारक असेल.*
2. *सचिवांसोबत अन्य अधिकारी उपस्थित राहणं आवश्यक असल्यास, त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना मंत्रिमंडळ बैठकीला उपस्थित राहण्याची पूर्वपरवानगी मुख्य सचिवांकडून प्राप्त करणं आवश्यक करण्यात आलं आहे.*
3. *केवळ मुख्यमंत्री कार्यालय आणि उपमुख्यमंत्री कार्यालयातील ज्या अधिकाऱ्यांना मंत्रिमंडळ बैठकीस उपस्थित राहणं आवश्यक आहे, अशा अधिकाऱ्यांची यादी या कार्यालयास कळवण्यात यावी. म्हणजे संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्येक मंत्रिमंडळ बैठकीस उपस्थित राहता येईल.*
4. *मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी कळवलेल्या अधिकाऱ्यांच्या यादी व्यतिरिक्त तसेच मंत्री कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी व इतर व्यक्तीस पूर्वपरवानगीशिवाय मंत्रिमंडळाच्या बैठक सभागृहात प्रवेश करण्यास मनाई असेल.*
5. *मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रालयीन विभागांच्या सचिवांना त्यांच्या विभागाच्या संबंधित विषयासंदर्भात क्षेत्रिय कार्यालयातील अधिकाऱ्यांची उपस्थिती आवश्यक वाटत असल्यावर त्यांनी विभाग प्रमुख दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्यासाठी मुख्य सचिव यांची लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करणं आलं आहे. ऐनवेळी त्याबाबत विनंती करण्यात येऊ नये, असंही बजावण्यात आलं आहे.*

# विनोद तावडेंची भेट, निवडणुकीत उलटफेर थेट!

## भाजपने गेम फिरवला, जुना साथीदार पुन्हा सोबतीला



**नवी दिल्ली :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर देशाच्या राजकारणात मोठी घडामोड पाहायला मि ळत आहे. भोजपुरी अभिनेते आणि गायक पवनसिंह यांना भाजप आघाडीत परत आणण्यात भाजपला यश मिळालं आहे. बिहार निवडणुकीचा निकाल अपेक्षित लागला, तर पवन सिंह यांना भाजप राज्यसभेवर पाठवण्याची शक्यता वर्तवली जात आहे.पवन सिंह यांनी मंगळवारी दिल्लीत येऊन भाजप सरचिटणीस विनोद तावडे यांच्यासह आपले एकेकाळचे कट्टर विरोधक आणि राष्ट्रीय लोकमोर्चाचे प्रमुख उपेंद्र कुशवाह यांची भेट घेतली. नंतर ते भाजपचे दिग्गज नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाही भेटले. यानंतर ते काहीही न बोलता हात जोडून मार्गस्थ झाले.बिहारी जनतेमध्ये असलेली त्यांची लोकप्रियता लक्षात घेऊन, तेजस्वी यादव यांनी डाव टाकण्याआधी त्यांना आपल्याकडे खेचण्यासाठी भाजपने विशेष प्रयत्न केले. भाजपने त्यांना निलंबित केल्याने कुशवाह यांच्या पक्षाच्या म्हणजेच 'एनडीए'च्या मार्गाने त्यांनी भाजपचा प्रचार करावा, अशी रणनीती आहे.म गील वर्षी 'एनडीए'च्या उमेदवाराच्या विरोधात स्वतंत्र उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूक लढवल्याबद्दल भाजपने पवन सिंह यांना निलंबित केले होते. त्यानंतरही ते 'एनडीए'चे समर्थक राहिले आहेत. बिहारमध्ये भाजप आणि मित्रपक्षांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये ते वेळोवेळी सहभागी होत आले आहेत.

पवन सिंह यांचे 'एनडीए'मध्ये परतणे बिहार निवडणुकीत भाजपसाठी फायद्याचा करार मानला जात आहे. पवन सिंह यांनी सन २०२४ मध्ये कराकट मतदारसंघातून स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडणूक लढवली. परंतु भाकप-माले पक्षाच्या राजाराम सिंह कुशवाह यांनी त्यांचा पराभव केला. दरम्यान, पवनसिंह यांनी प्रथम कुशवाह यांच्याशी असलेले त्यांचे संबंध सुधारले पाहिजेत, ही भाजप नेतृत्वाची इच्छा असल्याचे सूत्रांकडून समजते.

# रायगड जिल्ह्याच्या राजकारणात डोंबाऱ्याचा खेळ! तटकरेंच्या शिलेदाराचं प्रत्युत्तर



**रायगड :** 'रायगड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये खासदार सुनील तटकरे तब्बल ४० वर्षांपासून म्हणजे १९९२ सालापासून सक्रिय आहेत. रायगडची जनता त्यांना वारंवार आपला लोकप्रतिनिधी म्हणून निवडून देत आहे. जे सुनील तटकरे यांच्या पायाला हात लावून मोठे झाले त्यांनी त्यांच्यावर टीका करण्याची ही जी काय आता नवीन शृंखला चालू केलेली आहे ती कुठेतरी थांबवावी, अन्यथा त्यांना याच्याही पेक्षा परखड शब्दांमध्ये भविष्यात उत्तरे दिली जातील', असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रवक्ते धनंजय देशमुख यांनी शिवसेनेचे अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांना दिली. महेंद्र दळवी यांनी रोहयात येऊन सुनील तटकरेंवर टीका केली होती. त्याला आता राष्ट्रवादीकडून प्रत्युत्तर देण्यात आलं आहे.

'हा डोंबाऱ्याचा खेळ डोंबार या सकट जे तिथे जाऊन करतायेत त्यांनी तो थांबवावा आणि या सगळ्या परिस्थितीमध्ये एकच सांगतो, अलिबागच्या आमदारांना माझी सूचना राहील, आम्हाला तुमच्या कौटुंबिक गोष्टीवर बोलायचं नाही. आम्हाला तुमच्यावर झालेल्या ४९८ च्या खटल्याबद्दल बोलायचं नाही, जो तुमच्या पत्नीने आपल्यावर दाखल केला होता. डोमेस्टिक व्हायलन्स (घरगुती हिंसाचा). त्याच्यावर आम्हाला आज बोलायचं नाही किंवा एमएसईबीचे खांब चोरले म्हणून तुमच्यावर गुन्हा दाखल केलेला. याच्यावर सुद्धा आम्हाला आज बोलायचं नाही', असं धनंजय देशमुख म्हणाले.'जर वेळ आली तर पुन्हा एकदा रोहेकरांचं सोडा पण अलिबागकरांना सुद्धा आठवण करून द्यायला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अलिबागमध्ये येऊन तुम्हाला उत्तर देईल एवढंच या निमित्ताने सांगतो', अशा इशारा राष्ट्र वादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे प्रवक्ते धनंजय देशमुख यांनी दिला.महेंद्र दळवी यांनी खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीका केली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आणलेल्या योजना आणि कामांचं सुनील तटकरे श्रेय घेतात, असा आरोप दळवी यांनी केला होता. तसेच 'आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपसोबत आली तर ठिक आहे. पण या नालायकांसोबत जाणार नाही', अशी खोचक टीका महेंद्र दळवी यांनी केली होती.

# अनिल देशमुखांवरील हल्ला खोटा होता?



**नागपूर :** महाराष्ट्राच्या राजकारणातील आताच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. माजी गृहमंत्री अपळश्र ऊशीर्हींझह यांच्यावर विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी झालेल्या कथित हल्ल्याप्रकरणी आता मोठी माहिती समोर येत आहे. नागपूर ग्रामीण पोलीस आणि फॉरेन्सिक तपासात संबंधित घटना खोटी असल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. नागपूर ग्रामीण पोलिसांनी न्यायालयात 'बी फायनल' रिपोर्ट पाठवल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी पुरावेच शोधले नाहीत तर फॉरेन्सिक तपास देखील केला होता. पण पोलिसांना या प्रकरणात कोणतेही तथ्य आढळले नाहीत. त्यामुळे या घटनेबाबत कोणताही तपास होऊ शकत नाही. ही घटना फर्जी होती असा आशयाचा रिपोर्ट पोलिसांकडून न्यायालयात देण्यात आला आहे. एक वृत्तवाहिनीने याबाबतचं वृत्त दिलं आहे.

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर १९ नोव्हेंबर २०२४ ला हल्ला झाला होता. ही घटना खरंच घडली होती की राजकीय सहानुभूती निर्माण करण्यासाठी ती घटना घडवण्यात आली होती? असा प्रश्न पोलिसांच्या बी फायनल रिपोर्टनंतर उपस्थित केला जात आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ट्रॉफी हवी तर सूर्यकुमारने पर्सनली येऊन..

**दुबई :** आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्षपद भूषवणारे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख आणि मंत्री मोहसिन नकवी यांनी हेकेखोरी कायम ठेवत आशिया कप ट्रॉफी विजेत्या भारतीय क्रिकेट संघाला देण्यास नकार दिला आहे. उलट भारतीय कर्णधार डीॆरझ्रीरी धरवरीं याने पर्सनली एसीसी कार्यालयातून ट्रॉफी घेऊन जावी, असे निर्देश मोहसीन नक्वी यांनी दिल्याची माहिती पाकिस्तानी मीडिया चॅनल जिओ सुपरने मंगळवार ३० सप्टेंबर रोजी दिली.

आशिया कपच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानला पराभूत केलं. ताणलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर भारतीय संघाने मोहसिन नकवी यांच्याकडून ट्रॉफी घेण्यास नकार दिला होता. त्यानंतर ट्रॉफी घेण्यासाठी एक तास वाट पाहावी लागली होती. अन्य देशांच्या पदाधिकाऱ्यांकडून ट्रॉफी देण्याचा पर्याय सुचवूनही नक्वींनी हेका कायम ठेवला. भारतीय संघ व्यासपीठावर जाण्याची वाट पाहत असताना एसीसीच्या एका अधिकाऱ्याने ट्रॉफी मैदानावरून नेल्याचं दृश्य पाहायला मिळालं.यानंतर, इउउख ने नक्वी यांच्या कृतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत आयसीसीकडे अधिकृत तक्रार करण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत. त्याच रात्री भारतीय क्रिकेट बोर्डाचे सचिव देवजित सैकिया यांनी नक्वी यांच्या कृतीवर तीव्र शब्दांत टीका केली होती.'आम्ही पाकिस्तानचे वरिष्ठ नेते असलेल्या एसीसी अध्यक्षांकडून आशिया कप २०२५ ची ट्रॉफी स्वीकारणार नसल्याचं ठरवलं आहे. हा एक जाणीवपूर्वक घेतलेला निर्णय होता. मात्र,यामुळे त्यांना ट्रॉफी आणि पदकं स्वतःसोबत घेऊन जाण्याचा अधिकार मिळत नाही. हे अत्यंत दुर्दैवी आणि खेळाडूवृत्तीला धरून नाही. आम्हाला आशा आहे की ट्रॉफी आणि पदके शक्य तितक्या लवकर भारताला परत केली जातील,' असे सैकिया यांनी नमूद केले.पाकिस्तानी मीडिया चॅनल जिओ सुपरने दिलेल्या वृत्तानुसार, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसीन नक्वी यांनी आशिया कप ट्रॉफी भारताला देण्यास नकार दिला आहे. ते एसीसीचे प्रमुख म्हणूनही काम पाहतात. त्यामुळे त्यांनी भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव याने एसीसी कार्यालयातून वैयक्तिकरित्या ट्रॉफी घेण्याचे निर्देश दिले आहेत.अंतिम सामन्यानंतर दोन दिवसांनी म्हणजेच मंगळवारी पाकिस्तानी मीडियाने वृत्त दिले की आशिया कप २०२५ ची ट्रॉफी सुपूर्द करण्याबाबत बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी वारंवार केलेल्या मागणीला मोहसिन नक्वी यांनी फेटाळून लावले आहे. त्यांनी भारतीय कर्णधाराने स्वतः येऊन ट्रॉफी घ्यावी असे म्हटले आहे.दुबई येथे मोहसीन नक्वी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एसीसीच्या नियमित बैठकीत हा मुद्दा उपस्थित झाला. शुक्ला यांनी ट्रॉफी हस्तांतरणासाठी वारंवार आग्रह धरला. मात्र, नक्वी यांनी हा मुद्दा बैठकीच्या अजेंड्यावर नसल्याचे उत्तर दिले. अखेर ते म्हणाले, की जर भारतीय संघाला ट्रॉफी हवी असेल, तर त्यांच्या कर्णधाराने ती घेण्यासाठी वैयक्तिकरित्या एसीसी कार्यालयाला भेट द्यावी.पाकिस्तानी मीडिया चॅनल जिओ सुपरने वृत्त दिले की, ट्रॉफी भारतीय संघाला दिली जाईल की नाही यावर कोणताही निर्णय घेण्यात आला नाही.




मोहसीन नक्वीचा निर्लज्जपणा सुरुच..




प्रादेशिक क्रिकेट संस्थांच्या जवळच्या सूत्रांनुसार, बैठकीला व्हर्च्युअल पद्धतीने उपस्थित असलेल्या बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी नक्वी यांच्या भूमिकेवर तीव्र प्रतिक्रिया दिली. त्यांनी त्याऐवजी ट्रॉफी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) मुख्यालयात हस्तांतरित करण्याची मागणी केली. एसीसी प्रमुखांनी सूर्यकुमार यादवला ट्रॉफी घेण्यासाठी निर्देश देणे, हे आशिया कपमध्ये खेळल्या गेलेल्या अनेक सत्तासंघर्षांपैकी एक आहे. भारताने पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या सामन्यात हस्तांदोलन करण्यास नकार दिल्यानंतर, नक्वी यांनी आपला संघ स्पर्धेतून माघारी घेण्याची धमकी दिली होती.

भारतीय संघाच्या कोणत्याही प्रतिनिधीने एसीसी कार्यालयात जाऊन ट्रॉफी आणि पदके घेण्याची शक्यता कमी आहे. कारण त्यांनी आशिया कपच्या पुरस्कार वितरण समारंभातच ते स्वीकारण्यास नकार दिला होता. बीसीसीआय त्यांच्या पुढील बैठकीत जागतिक संस्थेकडे (आयसीसी) अधिकृत तक्रार दाखल करण्याची अपेक्षा आहे.

## पराभवाचा धक्का अजूनही पाकला पचावता आला नाही

### आता भारतावर फिक्सिंगचा केला आरोप..

**मुंबई :** भारत आणि पाकिस्तान फायनल सामना रंगला ज्यात भारताने बाजी मारली. आशिया कप २०२५ ची ट्रॉफी जरी भारताने जिंकली असला तरीही प्रत्यक्षात भारताला ही ट्रॉफी अजून देण्यात आली नाही. भारताने या संपूर्ण स्पर्धेत पाकिस्तानवर आपला दबदबा निर्माण केला. पण आता पाकिस्तानला पराभवाचा धक्का पचवता आला नाही. आता भारतावर पाकिस्तानने कोणते आरोप केले आहे ते जाणून घ्या...

भारत जेव्हा जेव्हा पाकिस्तानला हरवतो तेव्हा नेहमीच त्यांचे रडगाणे सुरु असतात. अलिकडेच आशिया कप २०२५ च्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने पाकिस्तानचा ५ विकेट्सने पराभव केला. त्यानंतर, माजी पाकिस्तानी खेळाडू तन्वीर अहमद भारतावर टॉस-फिक्सिंगचा आरोप करत आहेत. तो दावा करतो की अंतिम सामन्यातील टॉस फिक्स होता. तन्वीर अहमदने त्याच्या फेसबुक पेजवरील व्हिडिओमध्ये म्हटले आहे की, 'मला १०० टक्के खात्री आहे की टॉस फिक्स होता.'तन्वीर अहमद पुढे म्हणाले, 'जर तुम्ही लक्षात घेतले तर, प्रत्येक सामन्यात, भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव नाणे फेकतो. प्रत्येक वेळी, तो सामनाधिकारींसह सर्वांपासून




दूर नाणे फेकतो. त्याला जवळ नाणे फेकण्यात काय अडचण आहे? सर्वजण त्याच्या जवळ उभे आहेत, मग ते इतक्या दूर का फेकायचे? हे सर्व योजनेचा भाग आहे. टॉस फिक्स झाला आहे हे मला कसे पटले ते मला समजावून सांगू द्या.'अंतिम सामन्यात, रिची रिचर्डसनने खेळपट्टीवरून नाणे उचलण्यापूर्वीच सूर्यकुमार यादव म्हणत होते की तो गोलंदाजी करू इच्छित होता. सामान्यतः, सामनाधिकारी नाणे पाहतात आणि नाणे जिंकणाऱ्या कर्णधाराकडे निर्देश करतात. नाणे किती अंतरावर पडले हे पाहता, ते हेड आहे की टेल हे सांगणे अशक्य आहे.' शिवाय, सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, नाणे हरल्यानंतर आणि प्रथम फलंदाजी केल्यानंतर पाकिस्तानने १९.१ षटकांत १४६ धावा केल्या. टीम इंडियाने १४७ धावांचे लक्ष्य २ चेंडू आणि ५ विकेट शिल्लक असताना पूर्ण केले.

## भारताची विजयी सुरुवात

### अमनजोत कौर आणि दिप्ती शर्माने श्रीलंकाला दिला दे धक्का..

**मुंबई :** महिला विश्वचषक २०२५ आजपासून सुरुवात झाली. आता आज पहिला सामना भारतीय महिला संघ आणि श्रीलंका महिला संघ यांच्यात रंगला. या सामन्यात श्रीलंकाने नाणेफेक जिंकली आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारताने २६९ धावा केल्या आणि श्रीलंकाला २७० धावांचे लक्ष्य दिले. भारताने हा सामना ५९ धावांनी जिंकला.

आयसीसी महिला विश्वचषक २०२५ सुरू झाला आहे. स्पर्धेतील पहिला सामना भारत आणि श्रीलंका यांच्यात गुवाहाटी येथील एसीए स्टेडियमवर खेळवण्यात आला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने हा सामना जिंकला. यासह, टीम इंडिया स्पर्धेत दमदार सुरुवात करण्यात यशस्वी झाली. या सामन्यात टीम इंडियाच्या विजयाच्या हिरो अमनजोत कौर आणि दीप्ती शर्मा होत्या. दोन्ही खेळाडूंनी बॅट आणि बॉल दोन्हीने उत्कृष्ट कामगिरी केली.या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि त्यांना चांगली सुरुवात करण्यात यश आले. स्मृती मानधना १० चेंडूत ८ धावा काढून बाद झाली. त्यानंतर हरलीन देओल आणि प्रतिका रावल यांनी संघाची धावसंख्या ८१ पर्यंत नेली. प्रतिका रावलने ३७ धावा केल्या. मात्र, त्यानंतर भारतीय डाव डगमगला. टीम इंडियाने १२४ धावांत ६




विकेट गमावल्या. अमनजोत कौर आणि दीप्ती शर्मा यांनी डाव सावरला.अमनजोत कौर आणि दीप्ती शर्मा यांनी सातव्या विकेटसाठी १०३ धावांची भागीदारी केली. अमनजोत कौरने ५६ चेंडूत ५७ धावा केल्या, ज्यात ५ चौकार आणि १ षटकार होता. दीप्ती शर्मानेही ५३ चेंडूत ३ चौकारांसह ५३ धावा केल्या. त्यानंतर स्नेह राणाने १५ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद २८ धावा केल्या. भारताला ४७ षटकांत ८ गडी गमावून २६९ धावा करता आल्या.

पावसामुळे श्रीलंकेला सामना जिंकण्यासाठी ४७ षटकांत २७१ धावांचे लक्ष्य देण्यात आले होते. प्रत्युत्तरात, श्रीलंकेने चांगली सुरुवात केली, सलामी जोडीने ३० धावा जोडल्या. एकेकाळी श्रीलंकेने २ विकेट गमावून १०३ धावा केल्या होत्या. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी जोरदार पुनरागमन केले आणि श्रीलंकेचा डाव उध्वस्त केला. संघ फक्त ४५.४ षटकांत खेळू शकला आणि २११ धावांवरच सर्वबाद झाला. भारताकडून दीप्ती शर्मा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरली. तिने १० षटकांत ५४ धावा दिल्या आणि ३ विकेट घेतल्या. स्नेह राणा आणि श्री चरणी यांनीही प्रत्येकी २ विकेट घेतल्या. क्रांती गौड, अमनजोत कौर आणि प्रतिका रावल यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# प्रेयसीची हौस भागविण्यासाठी तो बनला घरफोड्या

## १९ वर्षीय विद्यार्थ्याला अटक



**नागपूर :** प्रेमात माणूस वेडा होऊ शकतो असं आपण ऐकलं आहे. पण प्रेमात आपण चोर नक्कीच नाही होऊ शकत. मात्र नागपूरचा नमन पेठे नावाचा तरुण याला अपवाद आहे. नमन हा प्रेयसीच्या प्रेमात इतका वेडा झाला की तो चक्क चोरी करु लागला. त्याने साधीसुधी नाही तर घरफोडी सारखी अट्टल चोरी केली. त्याने एक किंवा दोन वेळा घरफोडी केली नाही. तर तब्बल नऊ वेळा घरफोडी करुन चोरी केल्याचं पोलिसांच्या तपासात उघड झालं आहे. विशेष म्हणजे त्याने चोरी का केली? याचं कारण ऐकून पोलीसही चक्रावले आहेत. आपल्या प्रेयसीची हौस भागवण्यासाठी आपण घरफोड्या बनल्याचं तो निर्लज्जपणे सांगतो. तो पकडला गेला नसता तर त्याने आपली कृत्य सुरुच ठेवली असती. पण पोलिसांनी योग्यवेळी त्याच्या मुसक्या आवळल्या. आता त्याच्यासोबत इतरही कोणी आरोपी होते का? ते सुद्धा पोलीस तपासातून समोर येईल.

प्रेयसीची हौस भागविण्यासाठी एक दोन नव्हे तर चक्क नऊ घरफोड्या करणाऱ्या विद्यार्थ्याला नागपूर गुन्हे शाखेच्या युनिट चारने अटक केली आहे. आरोपी चोरटा हा पदवीच्या प्रथम वर्षाला शिकतो. १४ सप्टेंबरला बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेवतीनगर परिसरात साडेतीन लाखांची घरफोडी झाली. या प्रकरणी बेलतरोडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.गुन्हे शाखेचे उपायुक्त राहुल माकणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट चारचे निरीक्षक कमलाकर गड्डीमे, सायबर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक विवेक झिंगरे आणि गुन्हे शाखा पोलिसांनी या प्रकरणाचा समांतर तपास सुरू केला. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे त्याचा शोध सुरू केला.पोलीस गस्तीवर असताना नमन हा विना क्रमांकाच्या मोटारसायकलने जाताना पोलिसांना दिसला. पोलिसांनी त्याला पकडले. त्याची चौकशी केली असता त्याने हुडकेश्वर बेलतरोडी, अजनी, सक्करदरा, प्रतापनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत नऊ घरफोड्या केल्याचे मान्य केले. प्रेयसीची हौस भागविण्यासाठी घरफोडी करीत असल्याचेही त्याने पोलिसांना सांगितले. पोलिसांनी नमनकडून ७८ हजारांची रोख, मोबाईल, सोन्याच्या दागिन्यांसह २० लाखांचा ऐवज जप्त केला.

# वाद मिटवायला गेला अन पत्रकाराच्या लेकाला संपवल; यशसाठी भरपावसात मित्र रस्त्यावर



**बीड :** बीड शहरातील पत्रकार देवेंद्रसिंग ढाका यांच्या मुलाला त्याच्याच मित्राने चाकूने वार करत संपवलं. क्षुल्लक कारणावरुन झालेल्या वादावादीतून या मित्राने २२ वर्षीय यशचा जीव घेतला. गुरुवारी रात्री माने कॉम्प्लेक्स परिसरात बाचाबाचीत सूरज काटे या मित्राने यशवर चाकूने वार केले. थेट पोटात आणि छातीत वार केल्याने यश रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्याला तात्काळ रुग्णालयात नेण्यात आलं, मात्र, तिथे डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केलं. या घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ आरोपी सूरजला अटक केली आहे. मात्र, या घटनेने बीडमध्ये एकच संतापाची लाट उसळलेली पाहायला मिळत आहे.पोलिसांनी यशचा मृतदेह ताब्यात घेतला असून तो शवविच्छेदनासाठी पाठवला. सध्या बीड येथील जिल्हा रुग्णालयात त्याच्या मृतदेहाचे शवविच्छेदन केले जात आहे. या घटनेने बीडमध्ये एकच खळबळ माजली असून नातेवाईक आणि मित्र परिवाराने आक्रमक भूमिका घेतल्याचं पाहायला मिळत आहे.या घटनेने संतप्त झालेले नातेवाईक आणि मित्रपरिवार आता थेट बीडच्या रस्तावर उतरला आहे. बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या समोर नातेवाईक आणि मित्रांनी अचानक रास्तारोको आंदोलन सुरू केले. आरोपीला पोलिसांनी तात्काळ अटक करून फाशी देण्यात यावी, अशी मागणी यावेळी केली जात आहे. भर पावसात हे रस्ता रोको आंदोलन सुरू असून तात्काळ पोलिस अधीक्षकांना बोलाऊन घ्या अशी मागणी होत आहे. यावेळी परिसरात मोठी गर्दी झाल्याचे पाहवयास मिळत आहे. यावेळी आंदोलकांनी जोरजोरात घोषणाबाजी केली.२५ सप्टेंबरला दुपारी सुरज आणि यश यांच्यात वाद झाला. मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी गेले असताना एकमेकांकडे बघण्यावरुन त्यांच्यात वाद झाला. त्यानंतर रात्री यशने हा वाद मिटवण्यासाठी सूरजला बोलावून घेतलं. मात्र, माने कॉम्प्लेक्स परिसरात त्यांच्यात पुन्हा वाद झाला आणि सूरजने चाकूने यशवर हल्ला केला. या घटनेत यश गंभीर जखमी होऊन कोसळला आणि तिथेच त्याचा मृत्यू झाला.

# गँगस्टर निलेश घायवळला पासपोर्ट मिळालाच कसा? धक्कादायक माहिती

**पुणे :** पुणे तिथे काय उणे असं नेहमी म्हटलं जातं. पुणे हे विद्येचं माहेरघर मानलं जातं. पुणे शहराला सांस्कृतिक वारसा आहे. या शहराला ऐतिहासिक महत्त्व आहे. पण हे शहर आता गुन्हेगाराच्या पुराने वेढलं आहे. इथे अनेक छोट्या-मोठ्या टोळ्या हैदौस माजवताना दिसतात. कधी कोयता गँग दहशत माजवताना दिसते. तर कधी गँगवॉर होताना दिसतो. गुन्हेगार अक्षरश: एकमेकांच्या जिवावर उठतात. हेही असे की थोडे काही महिन्यांपूर्वी पुण्यात दहशतवादी तरुण लपल्याची माहिती सम ोर आली होती. पुण्यात काहीतरी घातपात घडवण्याचा कट होता, अशी देखील माहिती समोर आली होती. अर्थात हा संवेदनशील आणि तपासाचा विषय आहे. त्याबाबत बोलणं योग्य नाही. पण सध्या फोफावरी गुन्हेगारी यावर बोलणं जास्त आवश्यक आहे.पुण्यात काही दिवसांपूर्वी गँगस्टर निलेश घायवळ याच्या टोळीतील आरोपींनी गाडी ओव्हर टेक करायला रस्ता दिला नाही या क्षुल्लक कारणावर एकावर गोळी झाडली. त्यानंतर लगेच थोडं पुढे जाऊन एकावर कोयत्याने वार केले. एवढा भयानक विषय पुण्यात झालाय. पुण्यात गणेश विसर्जनाच्या पूर्वसंध्येला टोळी युद्धाचा भडका उडालेलाच होता. त्यानंतर घायवळ गँगच्या आरोपींनी सर्वसामान्यांवर हल्ला केल्याने पुण्यातील सुरक्षा आणि कायदा व्यवस्था किती चिंताजनक अवस्थेत आहेत, याची प्रचिती येते.पोलिसांनी गुंड निलेश घायवळ याच्या टोळीतील आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांवर हल्ला करणा□या आरोपींना अटक केली आहे. तसेच पोलिसांनी आता घायवळ टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई देखील केली आहे. पण मोक्का लावला तरी त्यांचा म्होरक्या पोलिसांना गुंगारा देवून विदेशात फरार झाला आहे त्याचं काय?विशेष म्हणजे पोलीस, पासपोर्ट कार्यालय यांनाही या निलेश घायवळने पद्धतशीरपणे कळू न देता पासपोर्ट बनवला.

# हुंड्याच्या छळापायी विवाहितेची आत्महत्या

**भोपाळ :** पुन्हा एकदा हुंड्याच्या छळापायी एका महिलेला आपला जीव गमवावा लागल्याची घटना समोर आली आहे. मध्य प्रदेशातील मैहर पोलीस स्टेशन परिसरातून हुंड्यासाठी छळातून एका महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. रविवारी रात्री उशिरा एचडीबी फायनान्स कंपनीत काम करणाऱ्या नवविवाहित शशी मिश्रा (२४) या महिलेचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची माहिती आहे.


पतीने दावा केला आहे की तिने विष घेत आपलं आयुष्य संपवलं. तिच्या कुटुंबाने ही हत्या म्हटले आहे. तसेच, त्यांनी तिच्या पती आणि सासरच्या लोकांवर गंभीर आरोपही केले आहेत. पोलिसांनी मृत महिलेचा पती अतुल मि श्रा (२७) जो इंडसइंड बँकेत काम करतो त्याला अटक केली असून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

# साहेब, माझ्या बहिणीने बायकोला पळवलं! नवऱ्याची तक्रार

## व्हॉट्सअॅप चॅटमध्ये 'तसले' मेसेज, चक्रावून टाकणारी घटना

**जबलपूर :** आपण बऱ्याचदा अशा बातम्या पाहतो ज्यामध्ये दीर आपल्या वहिनीला पळवून घेऊन जातो. पण, मध्य प्रदेशातून एक भलतीच बातमी समोर आली आहे. येथे एक नंदेने आपल्या भावजयला पळवून नेलं आहे. त्याची तक्रार करण्यासाठी पतीने पोलीस ठाणे गाठलं. प्रकरण ऐकून पोलीसही चक्रावले.

एक व्यक्ती पोलीस ठाण्यात आला आणि पोलिसांना म्हणाला, साहेब माझ्या बहिणीने माझ्या पत्नीचे अपहरण केले. त्यांच्यात खूप जवळीक वाढली होती. त्यांनी एकत्र राहण्याचा निर्णय घेतला होता. माझ्या पत्नीच्या बेपत्ता होण्यामागे माझ्या बहिणीचा हात असल्याचा संशय मला आहे. मानसी घरी परतली, पण संध्याचा अद्याप पत्ता लागलेला नाही.' हे ऐकून पोलीसही आश्चर्यात पडले. मध्य प्रदेशातील जबलपूर जिल्ह्यातील



या प्रकरणाने संपूर्ण कुटुंब हादरले आहे.मैहर जिल्ह्यातील अमरपाटन येथील रहिवासी असलेल्या ३० वर्षीय आशुतोष बन्सलने सुमारे सात वर्षांपूर्वी संध्यासोबत प्रेमविवाह केला होता. लग्नानंतर या जोडप्याला एक मुलगा झाला. सुरुवातीला त्याच्या कुटुंबाने त्याच्या नात्याला विरोध केला असला तरी, हळूहळू गोष्टी सामान्य झाल्या. २०२२ मध्ये, आशुतोष संध्या आणि त्याच्या मुलासह शिक्षणासाठी जबलपूरला गेला. तो तेथील एका खाजगी महाविद्यालयातून डी.एड. करत होता.

जबलपूरमध्ये राहत असताना आशुतोषची चुलत बहीण मानसी वारंवार त्याच्या घरी येत असे. त्यांच्यात मैत्री झाली आणि हळूहळू ते खूप जवळ आले, एकत्र बाहेर फिरायलाही जाऊ लागले. आशुतोषला कधीही संशय आला नाही की त्यांचे जवळीक मैत्रीच्या पलीकडे जाऊ शकते. पण, १३ ऑगस्टला सकाळी संध्या अचानक त्याला न कळवता घराबाहेर पडली. दिवसभर तिचा शोध घेत होता, पण ती सापडली नाही. सीसीटीव्ही फुटेजमध्ये ती रांझी परिसरात जाताना दिसत होती. आशुतोषने गृहीत धरले की ती मानसीसोबत आहे. दुसऱ्या दिवशी, त्याला संध्या रेल्वे स्टेशनवर सापडली. तिथे फक्त संध्या मानसी नाही. जेव्हा त्याने संध्याला विचारलं तेव्हा तिने कोणतेही स्पष्ट उत्तर दिले नाही.दहा दिवसांनी २२ ऑगस्टला संध्या अचानक तिचा मोबाईल सोडून पुन्हा गायब झाली. तिच्या पतीने तिचा मोबाईल तपासला तेव्हा त्याला त्याची पत्नी आणि मानसीम धील व्हॉट्सअॅप चॅट्स पाहून धक्काच बसला. त्यामध्ये त्यांनी एकत्र राहण्याची योजना आखली होती.

सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. मात्र, मानसीने चौकशीत कोणतीही ठोस माहिती दिली नाही. त्यामुळे संध्या कुठे आहे हे गूढ सध्या सुटलेलं नाही.



## आधी म्हणाली करीनासारखी मुलगी हवी, लोकांनी आठवण करुन दिल्यावर बोलते गप्प बसा!

# का चिडली कियारा?

**मुंबई :** प्रसूती झाल्यानंतर अभिनेत्री कियारा आडवाणी लाईमलाईटपासून दूर आहे, पण कोणत्या ना कोणत्या कारणासाठी तिची चर्चा होतच असते. कियारा आणि सिद्धार्थला या वर्षी १५ जुलै रोजी मुलगी झाली. १६ जुलै रोजी चाहत्यांना त्यांनी ही आनंदाची बातमी शेअर केली. सध्या, कियारा तिच्या मातृत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात व्यस्त असल्याने ती सध्या लाईम लाईटपासून दूर राहते. कियारा कॅम ेऱ्यापासून दूर असली तरीही, सोशल मीडियावर सक्रिय असते. आता तिची एक कमेंट व्हायरल होत आहे.सोशल मीडियावर कलाकारांबद्दल वेगवेगळ्या व्हिडिओ, कमेंट व्हायरल होत असतात. किंबहूना कलाकारांच्या मुलांबद्दलही काही गोष्टी पसरतात. अलीकडेच, कियारा आपल्या मुलीशी संबंधित एक कमेंट पाहून चिडली. आणि तिने त्यावर थेट कमेंट करुन सुनावलं.खरं तर, काही वर्षांपूर्वी कियाराने करीना कपूरसारखी मुलगी हवी अशी इच्छा व्यक्त केली होती. तिने करीना कपूरसोबत 'गुड न्यूज' या चित्रपटात काम केले होते. या चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान तिने म्हटले होते की तिला तिच्या मुलीमध्ये करीना कपूरचे गुण हवे आहेत. कियाराने तिच्या गरोदरपणाची घोषणा केल्यापासून, ही कमेंट वारंवार चर्चेत आली आहे. अलीकडेच 'बॉली मसाला' नावाच्या एका इंस्टाग्राम पेजनेही ती कमेंट पोस्ट केली होती जी पाहून, कियारा रागावली.२०१९ मधील कियाराचे विधान पुन्हा पोस्ट करताना एका युजरने लिहिले, 'कियाराला तिच्या मुलीमध्ये करीना कपूरचे गुण हवे आहेत. कियारा आणि सिद्धार्थने अलीकडेच आपल्या मुलीचे स्वागत केले.' यावर प्रतिक्रिया देताना कियाराने लिहिले, 'आमच्या 'गुड न्यूज' चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान हे मी म्हटले होते. कृपया जुन्या मुलाखती वारंवार संदर्भाबाहेरचा अर्थ काढणे थांबवा.' कियाराने हात जोडून इमोजी देखील पोस्ट केला. या टिप्पणीवरून स्पष्ट होते की तिच्या मुलीचा सतत उल्लेख आणि तुलना तिला खटकत आहे. व्हायरल होणा□्या गोष्टी तिला आवडत नाहीये.२०१९ मध्ये आलेल्या 'गुड न्यूज' या चित्रपटात कियारा अडवाणीने अक्षय कुमार, दिलजीत दोसांझ आणि करीना कपूर यांच्यासोबत काम केले होते. गर्भधारणा आणि आयव्हीएफ या विषयांवर आधारित या चित्रपटाला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान कियाराने आपल्याला जर मुलगी झाली तर त्या मुलीमध्ये करीना कपूरसारखे गुण असावेत अशी इच्छा व्यक्त केली. कियारा आई होताच, तिच्या कमेंट सोशल मीडियावर पुन्हा व्हायरल झाली, ज्यामुळे कियाराने या जुन्या कमेंटची वारंवार पुनरावृत्ती होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.



# कतरिना कैफ ४२ व्या वर्षी प्रेग्नेंट

## पण खरंच वयाच्या ४० नंतर नॅचरली कंसीव होणं शक्य आहे ?कोणत्या वयानंतर धोका ?

**मुंबई** : कॅतरिना कैफने ती गरोदर असल्याची बातमी जाहीर केल्यावर तिच्या चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. बॉलिवूडमधील ही नामांकित अभिनेत्री सध्या ४२ वर्षांची आहे, त्यामुळे तिच्या या प्रेग्नन्सीबद्दल अनेक प्रश्न उभे राहू लागले. सामान्यतः लोकांना वाटतं की ३५ वर्षांनंतर महिलांची प्रजननक्षमता कमी होऊ लागते आणि ४० च्या पुढे नैसर्गिकरीत्या गर्भधारणा होणं फारच कठीण असतं. मग प्रश्न असा की खरंच या वयात नैसर्गिकरीत्या गर्भधारणा होऊ शकते का? जर होऊ शकते, तर कोणत्या अडचणी उद्भवू शकतात? तसेच, आधुनिक तंत्रज्ञानासारख्या आयव्हीएफच्या (खतत्र) मदतीने किती यश मिळतं? कॅटरिनाच्या चर्चेम ुळे अनेक महिला आणि कुटुंबे हाच विचार करू लागली आहेत. चला तर मग या विषयाचा सखोल आढावा घेऊया.

जन्मत: असणाऱ्या अंड्यांची संख्या आणि त्यांची घट महिला जेव्हा जन्माला येतात तेव्हा त्यांच्या शरीरात साधारण एक मिलियन अंडी (शससी) असतात. पण वय जसजसं वाढतं तसतशी ही संख्या झपाट्याने कमी होत जाते. ३५ व्या वर्षानंतर तर अंड्यांची गुणवत्ता आणि संख्या दोन्ही लक्षणीयरीत्या घटतात. याच कारणामुळे या वयानंतर गर्भधारणा करणे कठीण होते. अनेकदा महिलांना पीरियड्स नियमित येत असल्याने त्यांना वाटते की प्रजननक्षमता अजून टिकून आहे, पण प्रत्यक्षात शरीरातील हेल्दी अंड्यांचा साठा संपत चाललेला असतो

गायनोकॉलॉजिस्ट सांगतात की ४० वर्षांनंतर नैसर्गिकरीत्या गर्भधारणा होणं दुर्मिळ असलं तरी अशक्य नाही. मात्र अशा प्रेग्नन्सीमध्ये धोके अधिक असतात. क्रोमोसोमल अडचणींमुळे गर्भाच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, तसेच आईलाही शारीरिक ताण सहन करावा लागतो. त्यामुळे या वयात गर्भधारणा ठरवताना नियमित वैद्यकीय तपासण्या आणि डॉक्टरांचा सल्ला घेण अत्यंत गरजेचं ठरतं.

आयव्हीएफ तंत्रज्ञानाची भूमिका आणि मर्यादा

आजच्या काळात टेस्ट ट्यूब बेबी किंवा आयव्हीएफ हा पर्याय अनेक जोडपी वापरतात. पण वयानुसार या तंत्रज्ञानाची यशाची टक्केवारी कमी होत जाते. ३५ वर्षांखालील महिलांमध्ये आयव्हीएफमुळे गर्भधारणा होण्याची शक्यता सुमारे ५०% असते. पण ३८-४० वर्षांदरम्यान ती केवळ ३०-३५% इतकी राहते. शिवाय गर्भधारणा झाल्यानंतरही गर्भपात होण्याचा धोका ३०-४०% पर्यंत असतो. त्यामुळे आयव्हीएफ हा पर्याय असला तरी तो शंभर टक्के यश देणारा नाही.



# शिक्षक मतदारसंघासाठी नव्याने मतदार नोंदणी कार्यक्रम जाहीर नव्याने मतदार याद्या तयार होणार

जनसंचलन/बुलढाणा

भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनानुसार अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदार यादीचे पुनरिक्षण करुन नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असल्याचे पत्रक सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केले आहे.

या मतदार नोंदणी कार्यक्रमासाठी अमरावती विभागाचे विभागीय आयुक्त हे मतदार नोंदणी अधिकारी असून, बुलढाणाचे जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून कार्य करतील. तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी व तहसीलदार हे पदनिर्देशित अधिकारी असतील. या पुनरिक्षण कार्यक्रमानुसार ३० सप्टेंबर रोजी सूचना प्रसिद्धी, १५ ऑक्टोबर २०२५ प्रथम पुनःप्रसिद्धी, २५ ऑक्टोबर रोजी द्वितीय पुनःप्रसिद्धी, नमुना १८ व १९ द्वारे दावे व हरकती सादर करण्याची अंतिम तारीख ६ नोव्हेंबर राहील. २० नोव्हेंबर रोजी हस्तलिखिते तयार करणे व प्रारूप मतदार याद्यांची छपाई करुन २५ नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबरपर्यंत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. २५ डिसेंबरपर्यंत दावे व हरकती निकाली काढून पुरवणी यादी तयार करण्यात येईल. या पुनरिक्षण कार्यक्रमाच्या शेवटी ३० डिसेंबर २०२५ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.मतदार नोंदणीची पात्रता : लोकप्रतिनिधित्व अधिनियमानुसार राज्य शासनाने निवडणूक आयोगाच्या मान्यतेने निश्चित केलेल्या माध्यमिक शाळेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये मागील ६ वर्षामध्ये किमान ३ वर्षे पूर्णवेळ शिक्षक म्हणून कार्यरत असलेले शिक्षक मतदार म्हणून नोंदणीस पात्र असून त्यांना मतदार नोंदणीसाठी सुधारित नमूना क्रमांक १९ मध्ये आवश्यक कागदपत्रांसह व प्रमाणपत्रांसह अर्ज सादर करता येणार आहे. या कार्यक्रमानुसार अमरावती विभागासाठीची शिक्षक विधानपरिषद मतदार संघाची यादी नव्याने तयार करण्याच्या सूचना निर्गमित झाल्या असल्याने ज्या व्यक्तींची नावे अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या विद्यमान मतदार यादीमध्ये समाविष्ट आहेत, त्यांनीही नव्याने नमूना-१९ आवश्यक कागदपत्रांसह व प्रमाणपत्रासह सादर करणे आवश्यक राहणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील पात्र शिक्षकांना संबंधित शिक्षक विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी नमुना १९ व आवश्यक कागदपत्रासह तसेच त्यासोबत विहित नमुन्यातील संबधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने दिलेले प्रमाणपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. हा नमुना १९ व विहित प्रमाणपत्राचा नमुना जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी (या निवडणूकीचे सहा. मतदार नोंदणी अधिकारी), विभागीय आयुक्तांकडून पदनिर्देशित केलेले तहसिलदार यांच्या कार्यालयात तसेच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, यांचे कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे. या विहीत नमुन्यात भरलेले अर्ज संबंधित तहसिल कार्यालयात भरुन देता येणार आहे. नमूना क्रमांक-१९ मधील एकगठ्ठा अर्ज, मग ते व्यक्तिशः दाखल केलेले असोत अथवा पोस्टाने पाठविलेले असोत, मतदार नोंदणीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. परंतू, पात्र शैक्षणिक संस्थेचे प्रमुख हे त्यांच्या संस्थेतील सर्व पात्र कर्मचाऱ्यांचे अर्ज एकत्रित पाठवू शकतील. एकाच पत्यावर राहणाऱ्या एखाद्या कुटुंबातील अन्य पात्र व्यक्तींचे अर्ज कुटुंबातील सदस्य दाखल करु शकेल व त्यास अशा व्यक्तींची मूळ प्रमाणापत्रे पडताळणीसाठी अर्जासोबत सादर करावी लागतील. राजकीय पक्ष, मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी, रेसीडेन्ट वेलफेअर असोसिएशन यांना एकगठ्ठा अर्ज करता येणार नाहीत, असेही कळविण्यात आले आहे. शिक्षक मतदारसंघातील बुलढाणा जिल्ह्यातील सर्व पात्र शिक्षकांनी वेळापत्रकानुसार सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात तसेच पदनिर्देशित अधिकारी यांचे तहसिल कार्यालयात ३० सप्टेंबर ते ६ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत विहित नमूना-१९ मधील अर्ज आवश्यक ते पुरावे व प्रमाणपत्रांसह दाखल करावेत, असे आवाहन अमरावती शिक्षक मतदारसंघाचे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# क्षय आरोग्य धाम येथे राष्ट्रीय पोषण महिना निमित्त जनजागृती उपक्रम साजरा

जनसंचलन/बुलढाणा

दरवर्षी सप्टेंबर महिना हा राष्ट्रीय पोषण महिना म्हणून साजरा करण्यात येतो. रुग्णाच्या आरोग्या संबंधित तक्रारी साठी केवळ औषधोपचारावर अवलंबून न राहता आहार देखील एक उपचार किंवा आहारद्वारे आरोग्य या विषयी समाजात जागरूकता निर्माण करणे या उद्देशाने कुपोषनावर आळा घालण्यासाठी पोषण महिना साजरा केला जातो. तसेच महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या आणि समाज्याच्या आरोग्याशी थेट जोडलेले आहे. याच उद्देशाने राज्य व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत स्वस्थ नारी, सशक्त परिवारफ हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. ज्यामध्ये महिलांच्या विशिष्ट आरोग्य विषयक सेवेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी लक्ष केंद्रित केले जात आहे. याच अनुषंगाने दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी क्षय आरोग्य धाम बुलढाणा येथे सर्व क्षय बाधित रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी आहार प्रदर्शनी व आहार मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उदघाटन माननीय वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुशील चव्हाण यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व धन्वंतरी पूजन करून करण्यात आले. याप्रसंगी रुग्णालयच्या आहारातज्ञ डॉ. मयुरी देशमुख यांनी सर्व रुग्णांना अतिप्रतियुक्त आहार संबंधित मार्गदर्शन केले व डॉ. सुशील चव्हाण यांनी महिलांचे आरोग्य व आहार यांचे परिवारात असणारे अनन्यसाधारण महत्व अधोरेखित केले. रुग्णालयच्या प्रभारी अधिसेविका अनिता गोडसे व मुकादम चव्हाण यांच्या तर्फे रुग्णालयात दाखल असण्याऱ्या सर्व क्षय बाधित रुग्णांना प्रोटीन पावडर चे डब्बे वितरित करण्यात आले तसेच परिसेविका मीना जोंधळे व आधीपरिचारिका दाबेराव यांच्यातर्फे पेंडखजूर चे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आहारातज्ञ डॉ. मयुरी देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रभारी अधिसेविका अनिता गोडसे, मुकादम रामनंदन चव्हाण व संपूर्ण वर्ग चार कर्मचारी यांचे विशेष योगदान लाभले. कार्यक्रमास डॉ. कोठारी, डॉ. तायडे व सर्व क्षय आरोग्य धाम येथील कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# जिल्हाधिकारी कार्यालयात माहिती अधिकार दिन साजरा

जनसंचलन/बुलढाणा



शासनाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात माहिती अधिकार दिन सोमवारी साजरा करण्यात आला. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे , निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव सेलार, तहसिलदार वृशाली केसकर,संजय महाले,विजय पाटील,जिल्हा नाझर मेतेकर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आधार सेवांचे नवे दर १ ऑक्टोबरपासून लागू होणार

जनसंचलन/बुलढाणा

युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया (युआयडीएआय) तर्फे जाहीर करण्यात आलेले सुधारित आधार सेवा दर १ ऑक्टोबरपासून राज्यातील सर्व आधार केंद्रांवर लागू होणार आहेत. हे सुधारित आधार सेवा दर अंमलबजावणी १ ऑक्टोबर २०२५ पासून ३० सप्टेंबर २०२८ पर्यंत लागू राहणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतुविभाग प्र. अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. नवीन आधार नोंदणी तसेच ५ ते ७ वर्षे आणि १५ ते १७ वर्षे या आधार अनिवार्य वयोगटातील मुलामुलींचे बायोमेट्रिक अद्ययावत हे मोफत राहणार आहेत. तर ७ ते १५ वर्षे आणि १७ वर्षावरील वयोगटासाठी बायोमेट्रिक अद्ययावत करण्यासाठी १ ऑक्टोबरपासून एक वर्षाकरीता शुल्क माफ करण्यात आले आहे. एका किंवा अधिक क्षेत्राचा अर्थात डेमोग्राफिक अद्ययावत करण्यासाठी ७५ रुपये, आधार नोंदणी केंद्राद्वारे पत्त्याचा पुरावा किंवा ओळखीचा पुरावा दस्तऐवज अद्ययावत करण्यासाठी ७५




रुपये, तसेच ई-केवायसी किंवा आधार शोधून त्याची रंगीत प्रत घेण्यासाठी ४० रुपये शुल्क निश्चित केले आहे. आधार केंद्रांना सुधारित सेवा दरांचे फलक केंद्रावर लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. १ ऑक्टोबरपासून नागरिकांकडून केवळ निश्चित दरानुसार शुल्क आकारणी करण्याचे आदेश दिले असून, जास्त शुल्क आकारल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार आहे. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक व जिल्हा प्रशासन याकडे लक्ष ठेवणार आहेत. नागरिकांना आधार सेवांबाबत तक्रार असल्यास किंवा १. या ई-मेलवर लेखी तक्रार सादर करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



# मेहकर हद्दीत तब्बल १.४३ कोटी रुपयांचा गुटखा जप्त!

## एलसीबीची जिल्ह्यातील सर्वात मोठी कारवाई!

जनसंचलन/ बुलढाणा

मेहकर पोलिसांच्या नाकावर टिच्चून प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक होत असली तरी, जिल्हा पोलीस दलाचे कान- नाक- डोळे असलेला विभाग अर्थात गुन्हे शाखा सजग असते. त्यामुळे आज मेहकर हद्दीत तब्बल १.४३ कोटी रुपयांचा गुटखा पकडल्याची जिल्ह्यातील सर्वात मोठी कारवाई करण्यात आली.ट्रक चालकासह ३ आरोपी ताब्यात घेण्यात आले आहे. प्रतिबंधित गुटखा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात येत आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे कार्यरत असल्यापासून त्यांनी कारवाईचा धडाका लावला आहे.आज स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम हे त्याचे ताब्यातील अशोक लेलँड कंपनीच्या २ ट्रकमध्ये शासन प्रतिबंधीत सुगंधीत पान मसाला व गुटखा माल बाळगून त्याची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने अमरावती कडून समृध्दी महामार्गाने मुंबईकडे जात आहेत. या माहितीवरून मेहकर पोलीस हदीत समृध्दी महामार्गावरील फर्दापूर टोलवर स्था. गु.शा. च्या पथकाने सापळा रचून माहिती प्रमाणे गुटखा व सुगंधीत पान मसाला भरलेले २ अशोक लेलँड कंपनीचे ट्रक पकडून त्यावर कारवाई केली. या कारवाईमध्ये दोन ट्रक चालकांसह ३ आरोपी जेरबंद करण्यात आले. त्यांच्याकडून गुटख्याचे २६४ पोते किंमत १,१३,०९,७६ रुपये, अशोक लेलँड कंपनीचे २ ट्रक किंमत ३०,००,००० रुपये असा एकूण १,४३,०९,७६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.आरोपी विरुध्द मेहकर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं.चे कलम २७४,२७५,२२३,१२३ सह अन्न व सुरक्षा माणके कायदा २००६ चे कलम २६,२७,५९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मोहम्मद इम्रान मो. हाफिज वय २८ वर्षे, रा. विद्यावानी मोहल्ला, अचलपूर जि. अमरावती,अजीम बेग हाफिज बेग वय ३६ वर्षे, रा. अन्सारनगर, अमरावती,एजाज अहेमद अजीज अहेमद वय ३१ वर्षे, रा. शिरजगांव ता. चांदूरबाजार जि. अमरावती अशी आरोपींची नावे आहेत.




# श्री बालाजी महाराजांच्या जयघोषात लाटामंडप उत्सव उभारणी!

जनसंचलन/ देऊळगाव राजा



प्रतितिरुपती म्हणून ओळख असलेल्या श्री बालाजी महाराजांचा आगळा वेगळा व केवळ देऊळगाव राजा शहरात पार पडणारा लाटामंडप उत्सव श्रींच्या जयघोषात व भक्तांच्या असीम उत्साहात संपन्न झाला. मंदिरातील घंटानाद, प्रवेशद्वारावरील नगारे आणि गोविंदा गोविंदा चा उदघोष तसेच बोल बालासाहेब की जय, लक्ष्मी रमण गोविंदा या जयघोषात श्री बालाजी मंदिर परिसर दुमदुमून निघाला. मानकरी, भाविक भक्तांनी अवघ्या साडे तीन तासात ४२ मंडपाला दोर बांधून दिड फुट व्यास व बत्तीस फुट उंचीच्या २१ महाकाय सागवानी लाटांची उभारणी केली. महाद्वाराशेजारील हनुमानाची प्राचीन दगडी मूर्ती व संस्थानसमोरील गरुडाची दगडी मूर्ती या दोन्ही मुर्त्यांना हा अखंड दोर बांधून महाकाय लाटामंडप उभारण्यात आला. या कार्यासाठी मानकऱ्यांचे व सर्व समाजबांधवांचे सहकार्य लाभले. लाटामंडप उभारणीनंतर सर्व मानकऱ्यांना श्री बालाजी संस्थानच्या वतीने प्रसाद वितरित करण्यात आला. श्री बालाजी संस्थानच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार आश्विन शु. ९-१० अर्थात बुधवार, दि. १ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपासून गुरुवार, दि. २ ऑक्टोबरच्या सायंकाळपर्यंत श्रींची पालखी मिरवणूक होईल. आश्विन कृ. ४ म्हणजेच शुक्रवार दि. १० ऑक्टोबर रोजी सूर्योदयी ५:४५ वा. ललितोत्सव संपन्न होईल. सर्व भाविकांनी दर्शनाचा, प्रसादाचा व यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त राजे विजयसिंह जाधव व व्यवस्थापक किशोर बीडकर यांनी केले आहे. भाविक भक्तांना सहजतेने कानगी तसेच शाश्वत अन्नदान देणगी देता यावी, यासाठी श्री बालाजी संस्थानच्या वतीने दोन स्वतंत्र क्युआर कोड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. भाविकांनी त्या क्यूआर कोडचा वापर करून देणगी जमा करावी, असे आवाहन श्री बालाजी संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# सूनगाव स्मशानभूमी सून्न मरणयातना कोणी -कोणी सोसाव्या?

जनसंचलन/ जळगाव जामोद

जळगाव जामोद तालुक्यातील सूनगाव ग्रामपंचायत ही मोठी ग्रामपंचायत असताना, सुनगाव ग्रामपंचायतच्या स्मशानभूमीची झालेली दुरावस्था झालीय. याकडे ग्रामपंचायत सुनगाव प्रशासनाने दुर्लक्ष केलेले आहे. या स्मशानभूमीचे टीनपत्रे हे तुटलेले उडालेले असून दोन ते तीन वर्षापासून ही दुरावस्था आहे. त्यामुळे सुनगाव येथील नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमि येथे ऊन वारा पाऊस यांचा सामना करावा लागत आहे. या स्मशानभूमीची दुरवस्था पाहता यावर एकही टिन पत्रा हा व्यवस्थित राहिलेला नाही. याकडे ग्रामपंचायत लक्ष केव्हा देणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.स्मशानभूमीची



दुरुस्ती हे तात्काळ सूनगाव ग्रामपंचायतने करावी, अशी सूनगाव येथील नागरिकांची मागणी आहे.

# विवाहितेचा छळ, आठ जणांवर गुन्हा दाखल

जनसंचलन/ साखरखेर्डा



माहेरहून पाच लाख रुपये घेऊन ये, नाहीतर संसार चालणार नाही, असा दबाव आणत एका विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी साखरखेर्डा पोलिस ठाण्यात पतीसह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेगाव येथील अंजली केशव अवचार हिचा विवाह उकळी येथील सतीश गजानन झोरे याच्यासोबत २९ फेब्रुवारी २०२४ रोजी झाला. पती आणि सासरच्या मंडळींकडून माहेरहून पाच लाख रुपये घेऊन ये, अशी वारंवार मागणी सुरू झाली. वडिलांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने ते पैसे देऊ शकले नाहीत. त्यामुळे अंजलीचा शारीरिक आणि मानसिक छळ सुरू झाला. प्रकरणी अंजलीच्या तक्रारीवरून पती सतीश झोरे, सासरे गजानन झोरे, सासू आणि इतर नातेवाइकांसह आठ जणांवर गुन्हा दाखल झाला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८